




# शेतकरी

ऑगस्ट–सप्टेंबर जोडअंक २०२४ ■ किंमत ७० रुपये ■ पाने १०८

Pune, Shetkari- Vol. 24, Issue 5 - August-September 2024 - Monthly - Price Rs. 70.00, Pages-108

१९६५ पासून शेतकऱ्यांच्या आवडीचे एकमेव मासिक. श्रमाच्या शेतीला ज्ञानाची जोड देऊन समृद्धीच्या वाटेवर.



## कृषी योजना भाग २ व पिक संरक्षण विशेषांक

# महाराष्ट्राला सर्वोत्कृष्ट कृषी राज्य पुरस्कार

१५ व्या कृषी नेतृत्व समिती २०२४ आणि ॲग्रीकल्चर टुडे या मासिकाच्या वतीने देण्यात येणारा सर्वोत्कृष्ट कृषी राज्य पुरस्कार मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य श्री. एकनाथ शिंदे व मा. कृषीमंत्री महाराष्ट्र राज्य श्री. धनंजय मुंडे यांना मा. केंद्रीय कृषीमंत्री श्री. शिवराजसिंग चौहान यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

पर्यावरण रक्षण, अन्न सुरक्षा आणि शाश्वत विकास या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करून दाखवल्याबद्दल महाराष्ट्राला सर्वोत्कृष्ट कृषी राज्य म्हणून निवडण्यात आले. हा पुरस्कार राज्यातील शेतकऱ्यांना समर्पित करत असून त्यांच्या घामामुळे आणि श्रमामुळे हा पुरस्कार एका शेतकरीपुत्राला स्वीकारण्याचे भाग्य मिळाले आहे असे मा मुख्यमंत्री यांनी सांगितले व पुरस्कारासाठी राज्याची निवड केल्याबद्दल सर्व परीक्षक आणि निवडकर्त्यांचे आवर्जून आभार मानले.

यावेळी केंद्रीय रस्ते परिवहन आणि महामार्ग मंत्री मा. श्री.



नितीन गडकरी, केंद्रीय कृषिमंत्री मा. श्री. शिवराजसिंह चौहान, ॲग्रीकल्चर टुडे समूहाचे अध्यक्ष मा. डॉ. एम. जे. खान, राज्य कृषिमूल्य आयोगाचे अध्यक्ष मा. श्री. पाशा पटेल आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

# क्रॉपकव्हरद्वारे वाढलेल्या रेडग्लोब द्राक्षबागेला मा. प्रधान सचिव कृषी यांची भेट





नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी तालुक्यातील मोहाडी येथील महिला शेतकरी श्रीमती मीराबाई श्रीपत जाधव यांच्या क्रॉपकव्हरमध्ये वाढविलेल्या रेडग्लोब द्राक्षांच्या बागेला महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाच्या प्रधान सचिव मा. श्रीमती व्ही. राधा, आयुक्त, कृषी मा. श्री रवींद्र बिनवडे, उपसचिव मा. श्रीमती प्रतिभा पाटील व नाशिक विभागाचे कृषी अधिकारी यांनी दि ०५ जुलै २०२४ रोजी भेट दिली. या आधुनिक तंत्रज्ञानाने बहरलेल्या द्राक्षबागेला त्यांनी भेट देऊन अभ्यास दौरा करीत पाहणी केली. क्रॉपकव्हरचे विविध फायदे समजावून घेतले. या वेळी मा. श्रीमती व्ही. राधा यांनी द्राक्षबागेसाठी क्रॉपकव्हरचा किती खर्च येतो, क्रॉपकव्हरचे मटेरियल ते बांधणीसाठी लागणाऱ्या स्ट्रक्चरसंदर्भातील बाबी, कीटकनाशकांचा वापर, गारांपासून द्राक्षपिकाचे संरक्षण, क्रॉपकव्हरमुळे उन्हाळ्यात द्राक्ष पिकाचा अतितापमानात कसा फायदा होतो, क्रॉपकव्हर वापरल्यास दर्जेदार द्राक्ष उत्पादन कसे होईल, याची बारकाईने माहिती घेतली. याचबरोबर क्रॉपकव्हरचे तोटे व त्याचा उपयुक्त कालावधी यांचाही सखोल आढावा घेतला. या संदर्भातील अनुदान योजनांचा उपस्थित अधिकारी वर्गाकडून आढावा घेण्यात आला. नवीन प्रयोग करणाऱ्या शेतकऱ्यांच्या बांधावर येत कृषी विभागाच्या प्रधान सचिव दर्जाच्या अधिकाऱ्यांनी भेट दिल्याने निश्चितच नवी ऊर्जा मिळाली. नवीन प्रयोग केल्याबद्दल मोहाडी (ता. दिंडोरी) येथील महिला शेतकरी श्रीमती मीराबाई श्रीपत जाधव-पाटील यांचे कौतुक केले व शुभेच्छा दिल्या.

पुढे त्यांच्या नाशिक दौरा कार्यक्रमात दि. ०६/०७/२०२४ रोजी सह्याद्री फार्मर प्रोड्युसर कंपनी लि.मोहाडी येथे भेट दिली व मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पाविषयी चर्चा केली, तसेच कांदा मुल्यसाखळी बद्दलही माहिती घेतली. या दौऱ्यादरम्यान मा. श्रीमती व्ही. राधा (प्रधान सचिव कृषि, महाराष्ट्र राज्य), मा. श्री. रविंद्र बिनवडे (आयुक्त कृषि, महाराष्ट्र राज्य), मा.श्री.कैलास मोते (संचालक,फलोत्पादन), मा. श्री. विलास शिंदे ( अध्यक्ष, सह्याद्री फार्म्स), श्री.चलवदे (विभागीय कृषी सहसंचालक नाशिक विभाग, नाशिक) श्री. विवेक सोनवणे (जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी,नाशिक), श्री.राजेंद्र निकम (प्रकल्प संचालक आत्मा, नाशिक) व इतर अधिकारी कर्मचारीवृंद उपस्थित होते.

(बातम्यांच्या बांधावर पान क्र. १०३ वर)

# ऑगस्ट महिन्यात पेरणीसाठी उपयुक्त

## रब्बी ज्वारी

प्रचलित वाण
(१० वर्षाच्या वरील)

**मालदांडी**
**परभणी ज्योती**
**परभणी मोती**
**पीकेव्ही क्रांती**
**फुले वसुधा**

नवीन वाण
(१० वर्षाच्या आतील)

**फुले सुचित्रा**
**परभणी शक्ती**
**परभणी सूपर मोती**



## राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान
(पौष्टिक तृणधान्य)

बियाणे वितरण

## रब्बी ज्वारी

समाविष्ट जिल्हे :

महाराष्ट्रातील नागपूर, सिंधुदुर्ग व
भंडारा जिल्हे वगळता
इतर ३१ जिल्हे

### योजनेतील लाभ :

बियाणे अनुदान
१० वर्षाच्या आतील वाण
रु. ३०००/- प्रति क्वि. किंवा
बियाणे किंमतीच्या ५०%
(यापैकी जे कमी असेल ते)

१० वर्षाच्या वरील वाण
बियाणे अनुदान रु. १५००/- प्रति क्वि
किंवा बियाणे किंमतीच्या ५०%
(यापैकी जे कमी असेल ते)

योजनेतील लाभासाठी नजिकच्या
कृषी विभाग किंवा
महाबीज कार्यालयाशी संपर्क साधावा.

## भाजीपाला बियाणे

**मेथी** - गायत्री



**पालक** - ऑल ग्रीन



**मुळा** - पुसा चेतकी
जापनीज् व्हाईट



महाबीज®

## महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित

''महाबीज भवन'', कृषी नगर, अकोला - ४४४ १०४. फोन : ०७२४-२४५५०९३ फॅक्स : २४५५१८७.
E-mail : homarketing@mahabeej.com, web.: www.mahabeej.com

महामंडळाचं महाबीज
तुमच्या विश्वासाचं बियाणं

Registered

RNI No. MAHMAR/2000/01270 पोस्टल रजिस्टर नं. PCW/031/2021-2023
Posted at BPC, Vishrambagwada, Pune 411030, Date of Posting: प्रत्येक महिन्याच्या १ ते ७ तारखेस














कृषी विभाग टेलिग्राम चॅनेल | कृषी विभाग फेसबुक पेज | कृषी विभाग ट्विटर खाते | कृषी विभाग Whats App चॅनेल | कृषी विभाग इन्स्टाग्राम | कृषी विभाग वेबसाइड | कृषी विभाग ब्लॉगस्पॉट | कृषी विभाग यू ट्यूब चॅनेल

## टोल फ्री नंबर : 1800 233 4000

शेतकरी :
ऑगस्ट- सप्टेंबर
जोडअंक २०२४

प्रेषक

**संपादक**

शेतकरी मासिक, कृषी आयुक्तालय, समिती सभागृह, दुसरा मजला, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००५
दूरध्वनी : ०२० २५५३७३३१

**शेतकरी बंधूनो**
त्वरा करा...
वर्गणी भरा!
पत्त्यावर
* असल्यास आपली वर्गणी एकच महिना शिल्लक आहे.
** असल्यास वर्गणी दोन महिने बाकी आहे.
*** असल्यास वर्गणी तीन महिने बाकी आहे.

**पोस्टमन बंधूनो**

या पत्त्यावर वर्गणीदार मिळत नसेल तर हा अंक कृपया कृषि विभागाच्या संबंधित तालुका कृषि अधिकारी कार्यालय/ मंडल कृषि अधिकारी कार्यालय किंवा नजिकच्या कृषि पर्यवेक्षक किंवा कृषि सहाय्यक यांच्याकडे द्यावा.

भारत सरकार सेवार्थ

श्री. ______________________

______________________

______________________

______________ पिन क्र. ______

'शेतकरी' हे मासिक मालक, कृषि विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकरिता, मुद्रक व प्रकाशक सुनील बोरकर यांनी आंनद पब्लिकेशन्स, १०६/१/ए, मुसळी फाटा, राष्ट्रीय महामार्ग नं. ६, धुळे रोड, धरणगाव, जि. जळगाव-४२५१०५, येथे छापून कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, कृषि भवन, शिवाजीनगर, पुणे- ४११ ००५ येथे प्रसिद्ध केले. संपादक - पुनम खटावकर.

'Shetkari' monthly publication is owned by Govt. of Maharashtra, Agriculture Department, Printed and Published by Sunil Borkar, Printed at Anand Publications, 106/1/A, Musali Phata, National Highway No.6, Dhule Road, Dharangoan, Dist. Jalgoan-425105 and Published at Commissionerate of Agriculture, Maharashtra State, Krushi Bhavan, Shivajinagar, Pune – 411005, Editor – Punam Khatavkar.

कृपया वाचकांनी शेतकरी मासिकाच्या प्रत्येक अंका बाबतचे बहुमोल अभिप्राय agrishetkari@gmail.com यावर पाठवावे.